67

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** बुलढाणा **P.S.(ठाणे):** मेहकर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0128 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 28/02/2025 19:27

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार

**Time Period (कालावधी):** पहर 4

**Date From (दिनांक पासून):** 28/02/2025

**Date To ( दिनांक पर्यंत):** 28/02/2025

**Time From (वेळेपासून):** 11:11 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 11:22 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 28/02/2025 **Time (वेळ):** 18:52 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 047

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 28/02/2025 18:52 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 0.500 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** अतिरीक्त सत्र न्यायालय मेहकर ,मेहकर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): उत्तम वामन खोडके

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1975

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रासंभाजी नगर मेहकर,मेहकर,मेहकर,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रासंभाजी नगर मेहकर,मेहकर,मेहकर,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9822309640

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | जनार्धन मनोहर बोदडे | | | 1. रा सावजि लेआउट खामगाव प्लाट ,खामगाव,मेहकर, बुलढाणा,महाराष्ट्र,भारत<br>2. रा सावजि लेआउट प्लाट नं 30 ,खामगाव,खामगाव,मेहकर, बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):



Scanned with OKEN Scanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रू दराचे दोनशे नोटा | 100,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

100,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

पो.स्टे.मेहकर
दिनांक:-28.02.2025

नावः- श्री.उत्तम वामन खोडके वय 50 वर्शे,व्यवसाय शिक्षक.जि.प.के. शाळा चिंचोली बोरे,रा.संभाजी नगर मेहकर.जि.बुलढाणा.

मी वरील ठिकाणी कुटंूबासह राहतो व जि.प.के.शाळा ,चिंचोली चिचोलीबोरे येथे िशक्षक या पदावर कार्यरत आहे.

दिनांक 24.02.2025 रोजी मी पो.नि.तिप्पलवाड लाप्रवि वाशिम यांना मोबाईलव्दारे तक्रार असल्याचे कळवील्याने माझी तक्रार नोंदविण्यासाठी व पुढील कारवाई करण्या करीता पो.नि.तिप्पलवाड लाप्रवि वाशिम,दोन पंच व लाप्रवि स्टाफ हे मेहकर ते फर्दापुर रोडवरील फर्दापुर समोर मामा भांजे हाॅटेल जवळ हजर आल्याने मी माझी लेखी तक्रार पो.नि.तिप्पलवाड लाप्रवि वाशिम यांना दोन्ही पंचासमक्ष दिली ती खालील प्रमाणे.

‘ मी समक्ष तक्रार लिहुन देतो कि, मी वरील ठिकाणी कुटूंबासह राहत असुन मी दि.08/09/2017 रोजी पो.स्टे. डोणगाव जि.बुलढाणा येथे भुजंग विलास काळे रा.शहापुर यांनी मला शाळेत येवुन जातीवाचक शिवीगाळ करुन विद्यार्थीणीचा चालु पेपर फाडला अशा माझ्या तक्रारीवरुन अपराध क्र.223/2017 कलम 353,323,504,506 भादंवि व 3(1)(1)(m)(r)(s)(u) अ.जा.अ.ज.अ.प्र.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. तत्कालीन तपास अधिकारी यांनी सदर गुन्हयात आरोपी विरुदध दोषारोप दाखल केले. सदर केसचा अत्याचार प्रतिबंध विषेश खटला क्र.163/2019 असा आहे.मा.अतिरीक्त सत्र न्यायालय, मेहकर येथे सदर खटल्यामध्ये सर्व साक्षी प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. मी दिनांक 21/02/2025 रोजी याच गुन्हयातील सिआरपीसी चे कलम 313 ची स्टेटमेंट नक्कल काढण्यासाठी सरकारी वकील अॅड.जे.एम.बोदडे अतिरीक्त सत्र न्यायालय मेहकर यांना भेटलो असता त्यांनी मला सांगीतल्यावरून मी नक्कल मिळण्याचा अर्ज लिहुन त्यावर त्यांची सही घेवुन नक्कल विभागाकडे दिला. परंतू त्यांनी मला तुमच्या केसमध्ये आरोपीला शिक्षा होईल अशी बाजु मांडायची असेल तर तुम्ही मला दि. 15/03/2025 पर्यंत 3 लाख रुपये रक्कम दया नाही तर तुमच्या विरोधात निकाल लागेल असे म्हणाले. परंतू मला माहित आहे की, सदर शासकिय कामासाठी रक्कम दयायची गरज नाही. मला सरकारी वकिल श्री.बोदडे यांना लाच रक्कम देण्याची ईच्छा नाही. सरकारी वकील श्री.बोदडे यांचा माझे सोबत कोणताही आर्थिक देवाण-घेवाणीचा किंवा उसणवारीचा व्यवहार नसुन आपसी दुश्मनी नाही.

मी दाखल केलेल्या केसमध्ये आरोपीला शिक्षा होईल अशी बाजु मांडण्यासाठी सरकारी अभियोक्ता श्री.जे.एम.बोदडे यांनी मला 3,00,000/- (तिन लाख रुपये) ची लाच मागणी केलेली आहे. सरकारी अभियोक्ता श्री.जे.एम.बोदडे , अतिरीक्त सत्र न्यायालय मेहकर यांच्यावर कारवाई करावी या करीता तक्रार देत आहे. कारवाई होण्यास विनंती आहे.

मी दिलेली लेखी तक्रार वाचुन दोन्ही पंच,मी व समक्ष म्हणुन पो.नि.तिप्पलवाड लाप्रवि यांनी सहया केल्या अॅड.जे.एम.बोदडे,सहा.सरकारी अभियोक्ता,अतिरीक्त सत्र न्यायालय मेहकर यांची भेट घेवुन पडताळणी कार्यवाही करावी लागेल असे पो.नि.तिप्पलवाड यांनी सांगितले. अॅड.जे.एम.बोदडे यांचे सोबत अतिरीक्त सत्र न्यायालय मेहकर येथे भेट होणार असल्याने पो.नि.तिप्पलवाड, यांनी पडताळणी कारवाई संबंधी सुचना दिल्या.



Scanned with OKEN Scanner

यांचे सह अ◌ॅड.जे.एम.बोदडे यांची भेट
सदर तक्रारीवरुन दि.24.02.2024 रोजी मला, पंच संदीप जासुद यांचे सह अ◌ॅड.जे.एम.बोदडे यांची भेट
घेवून त्यांची पडताळणी करणेकरीता पाठवून पंचासमक्ष पडताळणी केली असता, माझी अतिरीक्त सत्र न्यायालय
मेहकर येथे अ◌ॅड.जे.एम.बोदडे यांचेसोबत भेट होवून आमच्यामध्ये मी दाखल केलेल्या केस संबंधी बोलणी झाली
त्यादरम्यान अ◌ॅड.बोदडे हे मला म्हटले की, आपण बोललो होतो तिकड 3 च होत, त्यावर मी अ◌ॅड.बोदडे यांना
म्हणालो किती 3 लाख ? त्यावर अ◌ॅड.बोदडे यांनी मला हं... म्हटले, मी अ◌ॅड.बोदडे यांना म्हटलो की, एक काम
करा न तुम्ही 3 लाख म्हणता का नाही... थोडसंक माझ्या साठी.. त्यावर अ◌ॅड.बोदडे म्हटले तेच त्यासाठी
तुम्हाला मी म्हणुन राहीलो तुम्हाला ते दयायचं.. त्यावर मी म्हणालो केस आली तोंडावर आपला त्या दिवशि काय
शब्द होता..आपल्या दोघायचं काय बोलनं झालं की 15 तारीख आ◌ॅग्र्युमं◌ेटची हायनं... फक्त मला फायनल
आकडा सांगुन दया म्हणजे..त्यावर अ◌ॅड.बोदडे मला म्हणाले अडीच पर्यंत करा तुम्ही...... त्यावर मी त्यांना
म्हणालो, अडीच लाख... मंग दोन टप्यात दया लागतील... दोन टप्यात चालतील का? अ◌ॅड.बोदडे म्हटले दोन
टप्यात पण
ते आ◌ॅग्र्युमं◌ेटच्या आधि लागतील आं... त्यावर मी म्हणालो 15 तारखेच्या आधि देतो न तुम्हाला....अडीच
लाख म्हणता न तुम्ही अडीच लाख एखटया नका न घेउ.. एकदा 1 लाख घ्या अण एकदा दिड घ्या.... त्यावर
अ◌ॅड.बोदडे म्हटले बर तस करा.. त्यानंतर त्यांनी मला निकाल तुमच्या कडुन लागल्यानंतर स्वेच्छने 25,000
रुपये दया अशी अतिरीक्त मागणी केली. अ◌ॅड.बोदडे यांनी मला दिनांक 27/02/2025 किंवा दिनांक
28/02/2025 रोजी लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने सर्वानुमते ठरेल की,सापळा कारवाई ही दि.
27/02/2025 रोजी करण्यात येईल.पो.नि.तिप्पलवाड यांनी आम्हास गोपनियतेच्या सुचना दिल्या तसेच अ◌ॅड.
बोदडे यांना 2,50,000/- रु पैकी पहिला टप्पा म्हणुन 1,00,000/- रुपये हे लाच रक्कम देणे असल्याने सदरची
रक्कम ही मला दि.27/02/2025 रोजी हजर करण्याच्या सुचना दिल्या.

दि.27.02.2025 रोजी मी मेहकर ते फर्दापुर रोडवरील मामा भांजे हा◌ॅटेल जवळ असतांना दोन्ही पंच,पो.नि. तिप्पलवाड,लाप्रवि वाशिम स्टाफ तेथे आले. पो.नि.तिप्पलवाड यांनी मला, अ◌ॅड.बोदडे,सहा.सरकारी अभियाक्ता मेहकर यांना लाच म्हणुन देण्याकरीता 1,00,000/-रूपये रक्कम हजर करण्यास सांगितले असता मी 500/-रूपये दराच्या 200 नोटा, असे एकुण 1,00,000/-रूपये हजर केले. सापळा कारवाई ही अतिरीक्त सत्र न्यायालय मेहकर चे इमारती मध्ये करण्याचे असल्याने मा.अतिरीक्त सत्र न्यायाधीश मेहकर यांची परवाणगी मिळणे करीता पो.नि.तिप्पलवाड यांनी पत्र दिले असता त्यांनी मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश बुलढाणा यांच्या कडुन परवाणगी घेण्यात यावी असे लेखी कळवील्याने पो.नि.तिप्पलवाड यांनी बुलढाणा येथे जाउन मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश बुलढाणा यांची परवाणगी प्राप्त केली.त्यांनतर पो.नि.तिप्पलवाड यांनी मोबाईलवर का◌ॅल करुन मला नगर परीशद मराठी शाळा क्र.5 मेहकर च्या जवळ लागुन असलेल्या मोकळ्या मैदानात बोलावून अ◌ॅड.बोदडे, यांना लाच म्हणुन दयावयाचे रकमेस अ◌ॅन्थ्रासिन पावडर लावण्यात आली. पो.नि.तिप्पलवाड यांनी सापळा कार्यवाही संबंधी सुचना दिल्या. अ◌ॅल्ट्राव्हायोलेट लॅम्पचा प्रयोग करून दाखविले. पो.नि.तिप्पलवाड यांचे सुचनेवरुन मी अ◌ॅड.बोदडे यांना मोबाइलवर का◌ॅल करुन कुठे येण्यासंदर्भात विचारले असता त्यांनी मला,मेहकर ते डोणगाव रोडवरील पाखरे हा◌ॅस्पीटल समोर येण्याचे सांगीतले.माझे जवळ लाच रक्कम देउन व व्हाईस रेकार्डर लावुन मला पंच क्र.01 व वाहन चालक माझा मुलगा यांचे सह पाखरे हा◌ॅस्पीटल येथे रवाना केले, आमचे मागोमाग पो.नि. तिप्पलवाड,पंच क्र.02 व लाप्रवि वाशिम स्टाफ हे पाखरे हा◌ॅस्पीटल येथे माझे अगोदर पोहचुन दबा धरुन राहीले. पाखरे हा◌ॅस्पीटल समोर अ◌ॅड बोदडे हे हजर नसल्याने मी त्यांचे मोबाईलवर का◌ॅल केला. त्यांनी मला सांगीतले की तुम्ही मला उदया सकाळी किंवा संध्याकाळी कोर्टामध्ये येवून भेटा. त्यावर मी लाच रक्कम स्विकारल्याचा इशारा न करीता ठरलेल्या ठिकाणी परत गेला. पो.नि.तिप्पलवाड यांना हकीकत सांगीतली.त्यांनी सापळा कारवाई उदईक दि.28/02/2025 रोजी करण्यात येईल असे सांगीतले.

दि.28/02/2025 रोजी सापळा कारवाई करीता पो.नि.तिप्पलवाड,दोन्ही पंच व लाप्रवि स्टाफ हे नगर परीषद उर्दु उच्च प्राथमीक शाळा क्र.3 मेहकर येथे आले. मला पो.नि.तिप्पलवाड यांनी त्या ठिकाणी बोलावल्याने मी तेथे आलो. पो.नि.तिप्पलवाड यांनी मला सांगीतले की लाप्रवि वाशिम येथील एक कर्मचारी हस्ते मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यानी सापळा कारवाई आजमावीण्याबाबतचे माहिती पत्र दिले आहे.पो.नि.तिप्पलवाड यांच्या सुचने वरुन पोहवा आसिफ शेख यांनी अ◌ॅश्रा◌ॅसीन पावडर लावलेली लाचेची रक्कम माझे पॅंटच्या खिशात ठेवली. व व्हाईस रेकार्डर लावुन मला पंच क्र.01 यांचे सह अतिरीक्त सत्र न्यायालय मेहकर येथे पायदळ रवाना करुन माझे पाठोपाठ पो.नि.तिप्पलवाड,पंच क्र.2 व लाप्रवि स्टाफ हे येवुन अतिरीक्त सत्र न्यायालय मेहकर इमारती समोरील परीसरामध्ये पोहचुन दबा धरुन राहीले. मी अतिरीक्त सत्र न्यायालय मेहकर यांचे इमारतीचे मुख्य दरवाजा समोर असतांना मला तेथे अ◌ॅड बोदडे भेटले त्यांनी मला इशारा करुन वकील संघ हा◌ॅल मध्ये नेले. मी त्यांचे मागोमाग गेलो, पंच क्र.



Scanned with OKEN Scanner

01 सुदया माझे मागोमाग आले. त्यांच्यात व माझ्यात संभाषण झाले मी अॅड बोदडे यांना म्हटलो की तुमच्या म्हणण्याप्रमाणं एक लाख रुपये आणले.... त्यावर बोदडे यांनी मला बर म्हटले. मी अॅड बोदडे यांना म्हटलो की आता बाकीचे मी माझ्या हिशोबानं देईल... हिशोबानं म्हणजे 15 तारखेच्या आत... चालल न त्यावर अॅड बोदडे मला म्हटले ठिक हे. मी अॅड बोदडे यांना म्हटलो देउ का मंग? त्यावर अॅड बोदडे म्हटले दयानं.....देउन टाका....असे बोलुन माझे कडुन 1,00,000/- रु लाच रक्कम स्विकारल्याने मी पो.नि.तिप्पलवाड यांना लाच रक्कम स्विकारल्याचा 11:20 वा पुर्व नियोजित इशारा म्हणुन फोन केला असता पो.नि.तिप्पलवाड, पंच व लाप्रवि स्टाफ तेथे आले व अॅड.बोदडे,सहा.सरकारी अभियात्का मेहकर यांना लाचेसह पकडले. यशस्वी सापळा कारवाई दि.28/02/2025 रोजीचे सकाळी 11.11 वा. ते 11:22 वा चे दरम्यान अॅड.जे.एम.बोदडे, वय-61 वर्ष, सहा.सरकारी अभियोक्ता मेहकर, जि.बुलढाणा यांनी मी स्वतः फिर्याद देवुन पो. स्टे.डोनगाव येथे अपराध क्र.223/2017 कलम 353,323,504,506 भादंवि व 3(1)(1)(m)(r)(s)(u) अ. जा.अ.ज.अ.प्र. कायदया अन्वये दाखल केलेल्या केसमध्ये आरोपीला शिक्षा होईल अशी बाजु मांडण्यासाठी लोकसेवक अॅड. जनार्धन मनोहर बोदडे सहा.सरकारी अभियोक्ता,अतिरीक्त सत्र न्यायालय मेहकर जि.बुलढाणा यांनी तडजोडी अंती 2,50,000/- रुपयाची लाचेच्या स्वरुपात स्पष्ट मागणी करुन सापळा कारवाई दरम्यान लाच रक्कमेचा पहिला हप्ता म्हणुन 1,00,000/- रुपये स्विकारले म्हणुन माझी त्यांचे विरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.
माझी वरील फिर्याद पोहवा योगेश खोटे लाप्रवि वाशिम यांनी टंकलिखीत केली असुन मी वाचून पाहली,माझे संागणे प्रमाणेबरोबर व खरी आहे.

समक्ष — सही

(बालाजी आर.तिप्पलवाड ) — ( उत्तम वामन खोडके )
पोलीस निरीक्षक, — रा.संभाजी नगर मेहकर.जि.बुलढाणा.
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वाशिम

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
SANDIP SHIVAJI BIRANJE
**Rank** (पद): I (Inspector) **No.**(क्र.): 151010004022SB
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with OKEN Scanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

502.

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): BHAURAO PUNDLIKF
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PoliceInspector

Scanned with OKEN Scanner

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



Scanned with OKEN Scanner